श्री.ओंकार शंकर गायकवाड ,पशुधन पर्यवेक्षक पंचायत समिती कोपरगांव यांचे गैरवर्तणाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता अधिका-याची नेमणूक करणे बाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
पशुसंवर्धन विभाग.

जिल्हा परिषद आदेश क्र.पसं/आस्था-1/596/2025
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केले प्रमाणे

संदर्भ :- 1) या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्र.पसं/आस्था-1/298/2025 दिनांक 09.06.2025
2) गट विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगांव यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था1/1437 2025 दिनांक 01.07.2025
3) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम (6 )( 5 )
4) या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.पसं/आस्था-1/595/2025 दिनांक 11.08.2025

ज्याअर्थी , श्री.ओंकार शंकर गायकवाड ,पशुधन पर्यवेक्षक,पंचायत समिती कोपरगांव येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर राहणे,हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करुन कार्यालयीन वेळेत अनाधिकृत गैरहजर राहणे व वरिष्ठांचे आदेशांचे पालन न करता अवमान करणे अशा प्रकारचे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.1 अन्वये दोषारोप ठेवणेत आले होते.संदर्भ क्र.2 नुसार श्री.गायकवाड,यांना ज्ञापन बजावल्याची पोहोच इकडील कार्यालयास सादर केली आहे.सबब,त्यांचे विरुध्द न्याय हक्कांचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 6 च्या तरतुदीनुसार संदर्भ क्र.4 चे आदेशात नमुद केलेनुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करणेत आलेली आहे.तसेच सदरच्या चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा ,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 6 च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 6 (5) अन्वये ,जिल्हा परिषदेची बाजू मांडण्याकरीता सादरकर्ता अधिकारी म्हणून डॉ.श्रध्दा महादेव काटे पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती कोपरगांव यांची नेमणूक करणेत येत आहे.

सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे.त्याप्रमाणे संदर्भ क्र. 1 ते 4 मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे याचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजू मांडावी.परिशिष्ठ क्र.तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे.तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे.वरील कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in यां संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 202510011110064 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 01-10-2025 14:18:46
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रति,

डॉ.श्रदधा महादेव काटे पशुधन विकास अधिकारी ( वि.) पंचायत समिती कोपरगांव
व्दारा:-गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती कोपरगांव.

2/- सदर आदेशाची एक प्रत सबंधितास बजावून दुस-या प्रतीवर स्वाक्षरी घेवून पोहच या कार्यालयास पाठविण्यात यावी.

प्रत:- गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती कोपरगांव.
प्रत:- श्री.ओंकार शंकर गायकवाड,पशुधन पर्यवेक्षक पंचायत समिती कोपरगांव
व्दारा:-गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती कोपरगांव.
प्रत:- सहाय्यक आयुक्त , (चौकशी ) विभागिय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग,नाशिक.
प्रत:-निवड नस्ती.